# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः04.11.2025** **वारःमंगळवार**

---

१.भारत केवळ तंत्रज्ञानाचा ग्राहक नाही तर तंत्रज्ञान परिवर्तनातही अग्रेसर असल्याचा पंतप्रधानांचा विश्वास, १ लाख कोटी रुपयांच्या संशोधन, विकास आणि नवोन्मेष योजना निधीची तरतूद,

२.पंचमौली-देवळीपाडा उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी आठ हजार कोटींचा सामंजस्य करार,

३. पुणे जिल्हा परिषदेद्वारे ‘सर्वायकल कॅन्सर फ्री पुणे’ अभियानाचा आरंभ आणि

४.विश्वविजेत्या महिला क्रिकेटपटूंना बीसीसीआयकडून 51 कोटी रुपये बक्षीस.

**नवोन्मेष**

भारत आता केवळ तंत्रज्ञानाचा ग्राहक राहिलेला नाही, तर तांत्रिक बदलांमध्ये अग्रेसर बनला असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं उदयोन्मुख विज्ञान आणि तंत्रज्ञान नवोन्मेष शिखर परिषदेचं उद्घाटन करताना ते काल बोलत होते. देशामध्ये जगातील सर्वात यशस्वी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांची उभारणी झाली आहे आणि नवोन्मेषाची आधुनिक

परिसंस्था निर्माण करण्यासाठी संशोधन सुलभ करण्यावर सरकार लक्ष केंद्रित करत आहे, असं त्यांनी सांगितलं. भारत जगातील तिसरा सर्वात मोठा स्टार्टअप परिसंस्था बनला आहे आणि देशाच्या सेमीकंडक्टर क्षेत्रानं परिवर्तनात्मक झेप घेतली असल्याचंही मोदी यांनी नमूद केलं.

सरकारनं 'जय जवान, जय किसान' या घोषणेला 'जय विज्ञान, जय अनुसंधान'ची जोड दिली आहे. संशोधन विकासाकरिता 1 लाख कोटींचा निधी दिला असल्याचं सांगताना पंतप्रधान म्हणाले...

**<u>प्रकल्प</u>**

राज्यात सुरू असलेले विकास प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करण्यात यावेत, हे प्रकल्प सुरू असताना येणाऱ्या अडचणी तत्काळ दूर करुन नवीन प्रकल्प दोन ते अडीच वर्षात पूर्ण करण्याच्या दृष्टीनं  नियोजन करण्याचे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत एका बैठकीत दिले.

मुंबई उपनगर, ठाणे आणि पुणे इथं सुरू असलेल्या पायाभूत विकास प्रकल्पांचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. वरिष्ठ प्रशासनिक अधिकारी तसंच संबंधित प्रकल्पाचे कंत्राटदार यावेळी उपस्थित होते. माण -हिंजवडी-शिवाजीनगर या मेट्रो लाईन तीनचं काम पुढील वर्षी 31 मार्चपर्यंत पूर्ण होणार असल्याचं या बैठकीत सांगण्यात आलं.

**<u>उदंचन</u>**

धुळे आणि नंदूरबार जिल्ह्यांसाठी पंचमौली-देवळीपाडा उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी हरियाणातील एका कंपनीसोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आठ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार काल मुंबईत करण्यात आला. उदंचन जलविद्युत प्रकल्पातील गुंतवणूकदारांना जलवापर आणि पर्यावरणीय मंजुरीसह इतर सर्व परवाने जलदगतीनं मिळावेत, यासाठी यंत्रणा उभारण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

ग्रीड स्थिरतेसाठी सुमारे १ लाख मेगावॅट क्षमतेचे उदंचन जलविद्युत प्रकल्प उभारण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे. आतापर्यंत 50 उदंचन जलविद्युत प्रकल्पांसाठी सामंजस्य करार झाले असल्याची माहिती अपर मुख्य सचिव दीपक कपूर यांनी बैठकीत दिली. एकंदर अशा 51 प्रकल्पांद्वारे 70 हजार मेगावॅट वीज निर्मिती अपेक्षित असून त्याकरिता अंदाजे चार लाख कोटी रुपये गुंतवणूक आणि एक लाख चौदा हजार मनुष्यबळ रोजगार निर्मिती होणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<u>कर्करोग</u>**

पुणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या ‘सर्वायकल कॅन्सर फ्री पुणे’ म्हणजे गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून मुक्तता अभियानाचा आरंभ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते काल मुंबईत करण्यात आला. स्त्रियांमध्ये होणारा गर्भाशय मुखाचा कर्करोग हा देशातील दुसऱ्या क्रमांकाचा मोठ्या प्रमाणात आढळून येणारा आजार आहे. एचपीव्ही लस आणि वेळेवर केलेल्या छाननीमुळं या आजाराला प्रभावीपणे प्रतिबंध करता येऊ शकतो. त्यामुळं या

आजाराच्या बाबतीत महिलांमध्ये जनजागृती करणं आणि लसीकरणाचं प्रमाण वाढविण्याची गरज आहे, असं पवार यांनी यावेळी सांगितलं. शाळांमध्ये लसीकरणासोबत आशा सेविकांकडून घरोघरी जाऊन महिलांना या कर्करोगाची माहिती दिली जाणार आहे, असं पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी अभियानाची माहिती देताना सांगितलं

**इंट्रो-**

पुणे जिल्ह्याच्या काही तालुक्यांमध्ये बिबट्या-मानव संघर्ष वाढला असल्याच्या पार्श्वभूमीवर वन विभागाद्वारे आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेतली जात आहे. त्यासोबत नागरिकांनी देखील खबरदारी घेण्याची गरज आहे. याबाबत शिरूरचे वन परिक्षेत्र अधिकारी नीलकंठ गव्हाणे यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं...

**त्रिभाषा**

**इंट्रो-**

इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्यावरून मोठा गदारोळ झाल्यानंतर सरकारनं डॉक्टर नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या त्रिभाषा धोरण समितीनं नुकताच रत्नागिरीचा दौरा केला. त्याविषयी अधिक माहिती देत आहेत आमचे प्रतिनिधी...

स्क्रीप्ट

*त्रिभाषा धोरण समिती राज्यात आठ ठिकाणी फिरून विविध स्तरांमधल्या नागरिकांची मतं जाणून घेऊन अहवाल तयार करणार आहे. 'मराठी आणि इंग्रजी या भाषा पहिलीपासून आणि हिंदी पाचवीपासून शिकवण्याची सध्या सुरू असलेली पद्धतच कायम राहावी,' असं मत रत्नागिरीत मोठ्या प्रमाणावर व्यक्त झालं,' अशी माहिती समितीचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव यांनी दिली. राज्यातल्या सर्व नागरिकांना याबद्दलची आपली मतं मांडता यावीत, याकरिता tribhashasamiti.mahait.org हे संकेतस्थळ सुरू करण्यात आलं आहे. त्यावर प्रश्नावली आणि मतावली देण्यात आली असून, अधिकाधिक नागरिक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी त्याद्वारे आपली मतं मांडावीत, असं आवाहन समितीतर्फे करण्यात आलं. केवळ हिंदीच नव्हे, तर एकंदरच शालेय शिक्षणात कोणकोणत्या भाषांचा कोणत्या इयत्तेपासून आणि कशा प्रकारे अंतर्भाव करावा, याबद्दलची मतं यात नोंदवता येणार आहेत. त्या माहितीचं विश्लेषण करून सर्वसमावेशक अहवाल तयार केला जाणार आहे. या धोरणावर आधारित निर्णय येत्या २० वर्षांत जवळपास ४४ कोटी विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर परिणाम करणारा असेल. त्यामुळे आम्ही परिश्रमपूर्वक हा अहवाल तयार करत आहोत, असं डॉ. जाधव यांनी सांगितलं. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी*

**परवाना**

राज्यातील साखर गाळप हंगामाला शनिवारपासून सुरुवात झाली असून पहिल्या दिवशी २८ साखर कारखान्यांना गाळप परवाने देण्यात आले. आणखी ३३ कारखान्यांच्या परवान्यांची तपासणी साखर आयुक्तालयाच्या स्तरावर सुरू असून,

दोन दिवसांत त्यावर निर्णय होणार आहे, अशी माहिती साखर आयुक्त संजय कोलते यांनी काल दिली.

**<u>एसटी-सौर</u>**

एसटी महामंडळाच्या मोकळ्या जागेवर तसंच कार्यशाळेच्या आणि बसस्थानकांच्या छतावर ' सौरऊर्जा प्रकल्प ' उभारुन त्याद्वारे वर्षाला ३०० मेगावॅट वीज निर्मिती करण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं असल्याचं परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी जाहीर केलं आहे. यासंदर्भात आयोजित वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते काल बोलत होते. सध्या एसटी महामंडळाला दर वर्षी १५ मेगावॅट वीज लागते. त्याचा खर्च २५ ते ३० कोटी रुपये आहे. भविष्यात हजारो इलेक्ट्रिक बसेसच्या चार्जिंगसाठी अंदाजे २८० मेगावॅट वीजेची गरज लागणार आहे. ही वीज सौर ऊर्जेच्या माध्यमातून तयार केल्यास दरवर्षी अंदाजे १ हजार कोटी रुपये बचत होणार असल्याचं सरनाईक यांनी बैठकीत सांगितलं.

**<u>अंगणवाडी</u>**

स्मार्ट अंगणवाडी योजनेअंतर्गत परभणी जिल्ह्यातील सुमारे २६५ अंगणवाडी केंद्रांना मंजुरी देण्यात आली आहे. महिला आणि बालविकास राज्यमंत्री आणि परभणी जिल्हयाच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी याबाबत अधिक माहिती दिली.

**निधन**

ज्येष्ठ अभिनेत्री दया डोंगरे यांचं काल वार्धक्यानं निधन झालं. त्या ८५ वर्षांच्या होत्या. अनेक मराठी चित्रपट आणि नाटकांमधून त्यांनी केलेल्या भूमिका लोकप्रिय ठरल्या. मंतरलेली चैत्रवेल, लेकुरे उदंड जाहली, संकेत मीलनाचा ही त्यांची काही गाजलेली नाटकं. तर नवरी मिळे नवऱ्याला, मायबाप, आत्मविश्वास, उंबरठा हे काही गाजलेले चित्रपट आहेत. दूरदर्शनवरच्या गजरा या कार्यक्रमाचं निवेदनही दया डोंगरे यांनी केलं होतं.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी समाज माध्यमावर दया डोंगरे यांना आदरांजली वाहिली आहे.

**खासदार**

केंद्रिय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधऱ मोहोळ यांच्या पुढाकारानं होत असलेल्या पहिल्या खासदार क्रीडा महोत्सवातील शरीरसौष्ठव स्पर्धेत काल आकाश दडमल यानं खासदार श्रीचा किताब मिळवला.

**<u>बीसीसीआय</u>**

भारतीय महिलांनी आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक जिंकण्याचा पराक्रम केल्याबद्दल भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं संघातील खेळाडू, सहाय्यक कर्मचारी आणि निवड समितीला ५१ कोटी रुपयांचं रोख बक्षीस जाहीर केलं आहे. या सर्वांनी असामान्य कामगिरी केली आहे, संघाची लवचिकता, प्रतिभा आणि एकजुटीनं आपल्या देशाच्या आशा उंचावल्या आहेत अशा शब्दांत मंडळाचे अध्यक्ष मिथुन मन्हास यांनी त्यांचं कौतुक केलं आहे.

**<u>हवामान</u>**

राज्यात तुरळक ठिकाणी पावसाच्या हलक्या सरी पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**